नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३०६ Issue - 306 | वार शनिवार दि. २८ मार्च २०२६ Blow- Saturday Date 28 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात लॉकडाऊन अजिबात लागणार नाही

## मुख्यमंत्री फडणवीस; अफवा पसरवणाऱ्यांना फौजदारी कारवाईला सामोरं जावं लागेल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात इंधन आणि गॅसचा तुटवडा आहे, म्हणून आता राज्यात कोविड काळाप्रमाणे लॉकडाऊन लागेल अशा अफवा सोशल मीडियावरून व्हायरल होत आहेत. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांमध्ये उत्तर दिलं आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी इशारा देताना म्हटले की, लॉकडाऊन किंवा इंधन तुटवड्याबाबत खोट्या अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. अगदी फेक व्हॉट्सप मेसेज फॉरवर्ड करणे देखील गुन्हा ठरू शकतो, त्यामुळे नागरिकांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक देशांमध्ये 'शटडाऊन'सारखी परिस्थिती असली, तरी भारतात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही. देशाकडे किमान एक महिना पुरेल इतका इंधनसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याच मुद्द्यावर हरदीप सिंह पुरी यांनीही नागरिकांना अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. सरकारचा लॉकडाऊन लागू करण्याचा कोणताही विचार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, संकटाच्या काळात संयम बाळगणे गरजेचे असून अफवा पसरवणे देशासाठी घातक ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात मोठी कपात केली आहे. पेट्रोलवरील शुल्क ₹१३ वरून ₹३ पर्यंत कमी करण्यात आले असून, डिझेलवरील ₹१० प्रति लिटर उत्पादन शुल्क पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे. यामुळे वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींचा भार सर्वसामान्यांवर पडणार नाही, अशी माहिती देण्यात आली.

एकूणच, सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे की देशात इंधन तुटवडा किंवा लॉकडाऊनची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांपासून सावध राहून अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा.

# लडाखमध्ये हिमस्खलन, सात जणांचा मृत्यू; श्रीनगर-लेह महामार्ग बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लडाख : लडाखमधील झोजी ला येथे श्रीनगर-लेह महामार्गावर झालेल्या हिमस्खलनात अनेक वाहने बर्फाखाली गाडली गेली. बर्फात गाडले गेल्यामुळे सात जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. महामार्ग बंद झाला. सोनमर्ग आणि द्रास जिल्हा प्रशासन, पोलीस, लष्कर, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन आणि एसडीआरएफ यांच्या सहकार्याने प्रशासनाने मदतकार्य सुरू केले आहे. यंत्रांचा आणि मनुष्यबळाचा वापर मोठ्या प्रमाणात करून बर्फ उपसण्याचे काम वेगाने सुरू आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी मदतकार्याचा आढावा घेतला तसेच मृतांना श्रद्धांजली वाहिली.

द्रासमधील झोजी ला पास येथील कॅन्टन-टर्न महामार्गावर हिमस्खलन झाले. वाहने बर्फाखाली गाडली गेली. या दुर्घटनेत तीन पुरुष, एक महिला आणि एका मुलाचा मृत्यू झाला. काही वाहने बर्फाखाली पूर्णपणे गाडली गेल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे, असे द्रासचे एसडीएम विशाल अत्री यांनी सांगितले. महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी बचावकार्य सुरू असल्याची माहिती अत्री यांनी दिली. बचावकार्य काश्मीरमधील सोनमर्ग बाजूने आणि लडाखमधील द्रास बाजूने सुरू असल्याचे ते म्हणाले. महामार्गाचा मोठा भाग हिमस्खलनामुळे प्रभावित झाला. अद्याप किमान १५ वाहने बर्फाखाली पूर्णपणे गाडली गेली असल्याचेही त्यांनी सांगितले.

बर्फ हटविणारी यंत्र, पोलीस, एसडीआरएफ, बीआरओ आणि लष्कराच्या रुग्णवाहिका मदतकार्यात गुंतल्या आहेत. सध्या १०० जणांचे मनुष्यबळ मदतकार्यात गुंतले असल्याचे द्रासचे एसडीएम विशाल अत्री म्हणाले. मेघा टनेलच्या कर्मचाऱ्यांचीही मदत घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

हिमस्खलन झोजिलाच्या 'झिरो पॉइंट'जवळ झाले. या उंच भागातून जाणारी बर्फाखाली गाडली गेली. ही घटना अचानक आणि वेगाने घडली. अनेकांना सावरण्याची संधीच मिळाली नाही, असे अत्री म्हणाले.

श्रीनगर-लेह महामार्ग हा एनएच-१ म्हणून ओळखला जाणारा ४३४ किलोमीटरचा एक महत्त्वाचा मार्ग आहे, जो श्रीनगर आणि लेह यांना जोडणारा मुख्य दुवा आहे. हा ११,५७५ फूट उंचीवरील झोजिला खिंडीतून जाणारा रस्ता त्याच्या भोवतालच्या निसर्गरम्य दृश्यांसाठी आणि उंचीवरील आव्हानांसाठी प्रसिद्ध आहे.

# एस-४०० मिसाइलसह संरक्षण उपकरणांच्या खरेदीस मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय संरक्षण मंत्रालयाने हवाई दलासाठी रशियाकडून एस-४०० एअर डिफेन्स सिस्टमची अतिरिक्त बॅटरी खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. रक्षा मंत्रालयाच्या डिफेन्स एक्विझिशन कौन्सिलने (डीएसी) आज या प्रस्तावाला मान्यता दिली. भारताने २०१८ मध्ये रशियाशी एस-४०० एअर डिफेन्स मिसाईल सिस्टम खरेदी करण्यासाठी ४०,००० कोटी रुपयांची करार केलेली होती. या करारानुसार भारताला ५ स्क्वॉड्रन्स मिळणार आहेत, ज्याची डिलिव्हरी २०२१ पासून सुरू झाली होती.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या डीएसीच्या बैठकीत सुमारे २.३८ लाख कोटी रुपयांच्या विविध हत्यारं आणि विमान खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.बैठकीत रक्षा मंत्री राजनाथ सिंग यांनी भारतीय हवाई दलासाठी रशियाकडून लांब पल्ल्यावरील सतह-हवेत मार करणारी एस-४०० मिसाईल सिस्टम, मिडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट, रिमोटली पायलटेड स्ट्राईक एअरक्राफ्ट आणि एसयू-३० एयरो इंजिन एग्रीगेट्सच्या ओव्हरहॉलच्या प्रस्तावांना देखील मंजुरी दिली. भारतीय हवाई दलात मिडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट एएन-३२ आणि आयएल-७६ बेडेच्या जागी समाविष्ट केले जातील. यामुळे हवाई दलाच्या धोरणात्मक, सामरिक आणि ऑपरेशनल एअरलिफ्ट गरजा पूर्ण होतील. रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट आक्रमक प्रतिसादासह समन्वित हवाई ऑपरेशन्सची क्षमता वाढवेल. तसेच हे विमान स्टेल्थ इंटेलिजन्स, देखरेख आणि टोही उपक्रमांनाही महत्त्वपूर्ण समर्थन देईल.

भारतीय हवाई दलासोबतच या बैठकीत भारतीय सैन्याच्या गरजेनुसारही अनेक हत्यारांची खरेदी मंजूर करण्यात आली. भारतीय सैन्यासाठी एयर डिफेन्स ट्रॅक्ड सिस्टम, आर्मर-पिअसिंग टँक म्युनिशन, हाई-कॅपेसिटी



रेडिओ रिले, धनुष्य गन सिस्टम आणि रनवे इंडिपेंडेंट एरियल सर्व्हिलन्स सिस्टमसाठीही मंजुरी देण्यात आली.एयर डिफेन्स ट्रॅक्ड सिस्टम भारतीय सैन्याला रिअल-टाइम वायुदल संरक्षण नियंत्रण आणि अहवाल क्षमतेसाठी मदत करेल, तर हाई-कॅपेसिटी रेडिओ रिले विश्वासार्ह आणि अखंड संपर्क सुनिश्चित करेल. धनुष्य गन सिस्टम सेना क्षमतेत वाढ करून भारतीय सैन्याला विविध प्रदेशांमध्ये दीर्घ अंतरावर अचूक लक्ष्य साध्य करण्यास मदत करेल.

याशिवाय, डीएसीने भारतीय तटरक्षक दलासाठी हेवी ड्यूटी एअर कुशन वाहनांच्या खरेदीलाही मंजुरी दिली आहे. या वाहनांचा उपयोग मल्टी-पर्पस समुद्री तटीय मोहिमा, उच्च गती तटीय पेट्रोलिंग, टोही आणि बचाव मोहिमा, जहाजांना सहाय्य व कर्मचाऱ्यांसह लॉजिस्टिक वाहतुकीसाठी केला जाईल

# सोलापूरसह राज्यात पुन्हा अवकाळीचा दणका! अनेक पिके भुईसपाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसानं डोकं वर काढलं आहे. या पावसामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान होत आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. आज धाराशिव जिल्ह्यासह अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. यामध्ये फळबागांसह कांदा, गहू, कलिंगड या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.



**धाराशिवमध्ये पुन्हा वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस**

धाराशिवमध्ये पुन्हा वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस सुरु झाला आहे. लोहारा, धाराशिव, तुळजापूर परिसरामध्ये अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, ज्वारी पिकासह फळबागांना फटका बसला आहे. पंधरवाड्यात दुसऱ्यांदा अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. यापूर्वी गारपिटीमुळे द्राक्ष, आंबा आणि कलिंगड बागायतदार शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

**अहिल्यानगरमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस, गहू, कांदा, कलिंगड शेतीला फटका**

अहिल्यानगर शहरात तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली आहे. राज्याच्या हवामान विभागाने महाराष्ट्रातील काही भागांत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवली होती. काही दिवसांपूर्वीच अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील पारनेर, शेवगाव, पाथर्डी आणि श्रीगोंदा तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली होती. आज पुन्हा जोरदार वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यातील गहू, कांदा, कलिंगड सह शेतातील पिकांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात अवकाळी पावसामुळं द्राक्षसह केळी बागांचे नुकसान**

मोहोळ तालुक्यातील येवती-पापरी आणि पेनूर परिसरात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. या नकसानीची पाहणी शिवसेनेच्या खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी केली आहे. सरकार आणि लाडके भाऊ एकनाथ शिंदे साहेब खंबीरपणे तुमच्या पाठीशी आहेत, असा शब्द देत त्यांनी हतबल झालेल्या बळीराजाला धीर दिला आहे. द्राक्ष बागा, केळी, आणि इतर नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडताना खासदारांसमोर अश्रूंना वाट मोकळी करुन दिली.

**बारामतीत अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी**

बारामती शहरात आज अचानक वातावरणात मोठा बदल झाला असून, वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. दिवसभर उकाडा जाणवत असताना सायंकाळच्या सुमारास आकाशात ढग दाटून आले आणि काही वेळातच जोरदार वाऱ्यासह पाऊस सुरू झाला. बारामती आणि परिसरात अचानक आलेल्या या बदलामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. अनेक ठिकाणी जोरदार वारे वाहताना दिसले, तर काही भागात पावसाच्या सरी कोसळल्या. या अवकाळी पावसामुळे उकाड्यापासून काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडण्याची शक्यता आहे.

## वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आदेश केला प्रसिद्ध

# घरगुती वीज ग्राहकांना फायदा, वीजेची कुठलाही दरवाढ नाही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महावितरणच्या २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आपला आदेश आज प्रसिद्ध केला आहे. महावितरणने पाच वर्षात वीजदर कपातीसाठी मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होणार आहेत. कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत. महावितरणच्या याचिकेवर आयोगाने गेल्या वर्षी मार्च अखेरीस एक आदेश दिला होता. त्या आदेशाला स्थगिती देण्यात आली होती.

महावितरणच्या पुनर्विचार याचिकेनुसार आयोगाने जून २०२५ मध्ये एक आदेश दिला होता. त्या आदेशाला काहीजणांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर बोट ठेऊन जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करून व तांत्रिक बाबी पूर्ण करून आदेश देण्याची सूचना नोव्हेंबरमध्ये केली होती. त्यानुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर जनसुनावणी करून, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आता आदेश दिला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले आहे. तसेच आता २०३० पर्यंतच्या वीजदराबाबत स्पष्टता आली आहे.

आयोगाने पाच वर्षांसाठी दिलेल्या आदेशापैकी १ एप्रिल २०२६ पासून दुसरे वर्ष सुरू होत आहे. परिणामी वीज ग्राहकांना यापूर्वीच्या दरापेक्षा अधिक सवलत मिळणार आहे. उदाहरणार्थ स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीसाठीच्या वीजवापरासाठी प्रति युनिट ८० पैसे सवलत मिळत होती ती आता २०२६ -२७ या आर्थिक वर्षात ८५ पैसे प्रति युनिट इतकी सवलत असेल. उद्योगांना व व्यावसायिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीतील वीज वापरासाठीची टीओडी सवलत चालूच राहणार आहे. या ग्राहकांना वीजदरात एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च महिन्यात २५ टक्के सवलत मिळणार आहे. परिणामी उत्पादनासाठीच्या महत्त्वाच्या पहिल्या पाळीत त्यांना सवलतीच्या दराने वीज मिळेल. १ एप्रिल २०२६ पासून आदेशाचे दुसरे वर्ष सुरू होत असल्याने वीजदरात आणखी कपात होणार आहे. महिना शंभर युनिटपर्यंत वीज ग्राहकांसाठीचा सरासरी दर ७ रुपये ३१ पैशावरून कमी होऊन ७ रुपये १० पैसे होईल. या ग्राहकांसाठीचा वीजदर पाच वर्षात २६ टक्के इतका कमी होणार आहे. नवा बहुवार्षिक वीजदर आदेश येण्यापूर्वी २०२५ पर्यंत हा दर ८ रुपये १४ पैसे होता.

शंभर ते तीनशे युनिट वापर असलेल्या ग्राहकांसाठीचा दर १३ रुपये १७ पैसे यावरून कमी होऊन १२ रुपये ९४ पैसे होईल. नवा बहुवार्षिक वीजदर आदेश येण्यापूर्वी २०२५ पर्यंत हा दर १३ रुपये २३ पैसे होता.

उच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठीचा दर १० रुपये ७८ पैसे यावरून कमी होऊन १० रुपये ७१ पैसे इतका होईल. नवा बहुवार्षिक वीजदर आदेश येण्यापूर्वी २०२५ पर्यंत हा दर १० रुपये ८८ पैसे होता. वरीलप्रमाणे सर्व वीज ग्राहकांसाठीचे दर कमी होणार आहेत. तसेच २०२९ -३० या आर्थिक वर्षापर्यंत ते दरवर्षी १ एप्रिल रोजी आणखी कमी होत जातील.

आयोगाने या आदेशात उच्चदाब व लघुदाब विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी २०२६ -२७ या वर्षासाठी ९ रुपये ५० पैसे प्रति युनिट दर निश्चित केला आहे. हा दर २०२८ -२९ पर्यंत स्थिर राहणार आहे. त्यामुळे विद्युत वाहनांच्या वापराला प्रोत्साहन मिळेल. हाऊसिंग सोसायट्या आपल्या आवारात विद्युत वाहनांच्या चार्जिंगसाठी लघुदाब केंद्र सुरू करू शकतात. घराच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांच्या सवलती कायम राहणार आहेत. नव्या दर रचनेत त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

## संपादकीय....

### मजबूत भारत

नवी दिल्ली : भारतीय संरक्षण मंत्रालयाने हवाई दलासाठी रशियाकडून एस-४०० एअर डिफेन्स सिस्टमची अतिरिक्त बॅटरी खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. रक्षा मंत्रालयाच्या डिफेन्स एक्विझिशन कौन्सिलने (डीएसी) आज या प्रस्तावाला मान्यता दिली. भारताने २०१८ मध्ये रशियाशी एस-४०० एअर डिफेन्स मिसाईल सिस्टम खरेदी करण्यासाठी ४०,००० कोटी रुपयांची करार केलेली होती. या करारानुसार भारताला ५ स्क्वॉड्रन्स मिळणार आहेत, ज्याची डिलिव्हरी २०२१ पासून सुरू झाली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या डीएसीच्या बैठकीत सुमारे २.३८ लाख कोटी रुपयांच्या विविध हत्यारं आणि विमान खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.बैठकीत रक्षा मंत्री राजनाथ सिंग यांनी भारतीय हवाई दलासाठी रशियाकडून लांब पल्ल्यावरील सतह-हवेत मार करणारी एस-४०० मिसाईल सिस्टम, मिडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट, रिमोटली पायलटेड स्ट्राईक एअरक्राफ्ट आणि एसयू-३० एयरो इंजिन एग्रीगेट्सच्या ओव्हरहॉलच्या प्रस्तावांना देखील मंजुरी दिली. भारतीय हवाई दलात मिडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट एएन-३२ आणि आयएल-७६ बेडेच्या जागी समाविष्ट केले जातील. यामुळे हवाई दलाच्या धोरणात्मक, सामरिक आणि ऑपरेशनल एअरलिफ्ट गरजा पूर्ण होतील. रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट आक्रमक प्रतिसादासह समन्वित हवाई ऑपरेशन्सची क्षमता वाढवेल. तसेच हे विमान स्टेल्थ इंटेलिजन्स, देखरेख आणि टोही उपक्रमांनाही महत्त्वपूर्ण समर्थन देईल. भारतीय हवाई दलासोबतच या बैठकीत भारतीय सैन्याच्या गरजेनुसारही अनेक हत्यारांची खरेदी मंजूर करण्यात आली. भारतीय सैन्यासाठी एयर डिफेन्स ट्रॅक्ड सिस्टम, आर्मर-पिअसिंग टँक म्युनिशन, हाई-कॅपेसिटी रेडिओ रिले, धनुष्य गन सिस्टम आणि रनवे इंडिपेंडेंट एरियल सर्व्हिलन्स सिस्टमसाठीही मंजुरी देण्यात आली.

# फलटण संस्थान .... श्रीमंत नाईक निंबाळकर ... एक ऐतिहासिक वारसा













**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

साल २०२६ च्या या साली फलटण येथील श्रीमंत नाईक निंबाळकर घराण्याचे दैवत श्री राम मंदिर येथे श्रीराम नवमी जन्म सोहळा अनुभविण्याचा योग आला. नुकत्याच केलेल्या तिरुपती व सभोवतालच्या परिसरातील मंदिरे सहलीच्या पार्श्वभूमीवर आपल्या महाराष्ट्रातील मंदिराची आजची भेट ही सुखद होती.

श्रीरामनवमीच्या आनंद सोहळ्यात सामील साहजिकच अनेक भाविक सहभागी झाले होते. मात्र त्या प्रचंड जनसमुदायात एक स्वयंशिस्त होती. सर्व भाविक स्वयस्फूर्तीने रांगेतून पुढे सरकत होते. कोठेही भाविक रांगेच्या पिंजर्याएत अडकवलेले नव्हते... न दोर्यांचे जाळे होते ... न अडथळ्यांची अडगळ ... ना ही पोलिसांचा ससेमिरा.. सर्व कसे शांतपणे पुढे सरकत होते. ना ही फोटो काढण्यास मज्जाव ... न ही पुजारीजणांची ढकला ढकली ... धक्का तर तेव्हा बसला जेव्हा नम्रपणे हात जोडून पुजारी व्यवस्थित पुरेसे दर्शन घेण्यास नम्र आवाजात विनवीत होते.

### एक शाही श्रीराम जन्म सोहळा

सार्वजनिक ठिकाणी जनसमुदायाची ही स्वयंशिस्त ही बरेच काही सांगून जाते. या जनतेचे संबंधित राजघराण्यावर असलेले प्रेम, विश्वास हीच या शिस्तीची प्रेरणा असावी. मंदिरातील सोहळ्याचे व्यवस्थापन अत्यंत वाखानण्यासारखे होतेच. पण मंदिराची देखभालही तितक्याच निगुतीने होत असल्याचे जाणवते. धन्यवाद बाबा(साहेब) या सुंदर अनुभतीसाठी.

श्रीरामांचे मनसोक्त दर्शन घेवून तृप्त झाल्यानंतर आमचे आप्तेष्ट प्राचार्य श्री. अशोक शिंदे यांचे घरी उत्तमप्रकारे पाहुणचार घडला. स्वादिष्ट व्यंजनाचा आस्वाद घेता घेता सोबतच जवळपास दोन तास ऐतिहासिक गप्पा घडल्या. यजमानांनी नुकतेच लिहिलेले गाव पांढरीच्या वैभवखुणा हे पुस्तक भेट दिले. या पुस्तकातील लेखातून हरविलेल्या गतकाळाचे वैभव आणि लहानपणीचे दिवस डोळ्यासमोर रुंजी घालू लागतात. धन्यवाद श्री. अशोक नामदेव शिंदे सर या उत्तम भेटीसाठी.

एकंदरीत दिवस सार्थकी लागला. जय श्रीराम.

**लेखनसीमा**
**किरण आ. खराडे**
**(या अनुषंगाने ऐतिहासिक लेखन लवकरच)**

# तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणासाठी बीज भांडवल योजना : एक सर्वांगीण उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्र शासनाने तृतीयपंथीय समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. बीज भांडवल योजना या नावाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश तृतीयपंथीयांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना कौशल्य प्रशिक्षण देणे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे.

**पार्श्वभूमी**

तृतीयपंथीय समाजाच्या समस्या विविध स्वरूपाच्या असल्यामुळे शासनाने स्वतंत्र कल्याणकारी यंत्रणा उभारण्याची गरज ओळखली. २०१८ मध्ये राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय मंडळे स्थापन झाली, तर २०२० मध्ये तक्रार निवारण समितीची स्थापना झाली. अखेर ११ मार्च २०२४ रोजी सर्वकष धोरण जाहीर करून तृतीयपंथीयांसाठी सर्व विभागांच्या योजना लागू करण्यात आल्या. या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे बीज भांडवल योजना.

**योजनेचे स्वरूप**

- कर्ज सुविधा : राष्ट्रीयकृत बँकांमार्फत लघु व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल.
- कौशल्य विकास : अप्रशिक्षित लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल, तर प्रशिक्षितांना त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक साधनसामग्रीसाठी कर्ज मिळेल.
- व्यवसायांची यादी : भाजी स्टॉल, चहा सेंटर, झेरॉक्स सेंटर, जनरल स्टोअर्स, बेकरी, ब्युटी पार्लर, मोबाईल शॉपी, मसाले तयार करणे, सलून, मिनी माल वाहतूक, इलेक्ट्रिशियन, मोबाईल दुरुस्ती, ए.सी. दुरुस्ती, गॅस शेगडी दुरुस्ती इत्यादी विविध व्यवसायांसाठी मदत मिळणार आहे.

**कर्जाचे प्रकार**

१. लघु कर्ज योजना - ₹२५,००० पर्यंत

२. मध्यम कर्ज योजना - ₹५०,००० पर्यंत

३. दीर्घ कर्ज योजना - ₹२,००,००० पर्यंत

प्रत्येक योजनेत लाभार्थ्याचा ५% हिस्सा, शासनाचे ४५% अनुदान आणि ५०% बँक कर्ज असे प्रमाण राहील. नियमित कर्ज फेडणाऱ्यांना व्याजावर ३% सूट मिळणार आहे.

**पात्रता निकष**

- महाराष्ट्रात किमान १० वर्षे वास्तव्य
- वय १८ ते ५० वर्षे
- सक्षम प्राधिकरणाचे ओळखपत्र
- कोणत्याही प्रकारचे जामीनदार किंवा तारण आवश्यक नाही
- यापूर्वी बीज भांडवल योजनेचा लाभ घेतलेला नसावा

**आवश्यक कागदपत्रे**

- अधिवास प्रमाणपत्र
- ओळखपत्र
- मतदान ओळखपत्र/आधार/पॅन/राशनकार्ड/लाईट बील
- व्यवसाय परवाना व स्थायी पत्ता
- व्यवसायासाठी लागणाऱ्या सामुग्रीचे कोटेशन
- जागेचा ७/१२ उतारा किंवा भाडेकरार
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र
- अर्जदाराचे दोन फोटो

अर्ज प्रक्रिया

लाभार्थ्यांनी शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयात सादर करावा.

**अंमलबजावणी यंत्रणा**

- राज्यस्तरीय समिती : सामाजिक न्याय मंत्री अध्यक्ष, राज्यमंत्री उपाध्यक्ष, प्रधान सचिव, आयुक्त समाजकल्याण व तृतीयपंथीय प्रतिनिधी सदस्य.
- जिल्हास्तरीय समिती : जिल्हाधिकारी अध्यक्ष, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, कोषागार अधिकारी, अग्रणी बँक अधिकारी, आयटीआय प्राचार्य, कौशल्य विकास अधिकारी व सहायक आयुक्त सदस्य सचिव.
- लक्ष्य : प्रत्येक जिल्ह्यात किमान २५ लाभार्थी, तर पहिल्या टप्प्यात राज्यभरात १००० लाभार्थी निश्चित.

**विशेष वैशिष्ट्ये**

- कौशल्य विकास प्रशिक्षण अनिवार्य
- स्वयंरोजगारासाठी वित्तीय सहाय्य
- सहकारी संस्था किंवा कार्यगटांना देखील लाभ
- नियमित कर्ज फेडणाऱ्यांना व्याजावर सूट
- मदत कक्ष (क्शश्र ऊश्रीज्ञ) पुणे येथे स्थापन
- प्रचार, प्रशिक्षण व प्रशासकीय खर्चासाठी ५% निधी राखीव

बीज भांडवल योजना ही तृतीयपंथीय समाजाच्या सक्षमीकरणासाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. या योजनेतून तृतीयपंथीयांना केवळ आर्थिक मदतच नव्हे तर कौशल्य विकास, उद्योजकता प्रशिक्षण आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळणार आहे. शासनाने आखलेल्या या सर्वसमावेशक धोरणामुळे तृतीयपंथीय समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, अशी अपेक्षा आहे.

**सुनील सोनटक्के,**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.**

# कवी डॉ. विशाल इंगोले स्मृती पुरस्कार तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या 'जळताना भुई पायतळी' कवितासंग्रहाला जाहीर..!



**५ एप्रिल रोजी दुसरबीड येथे ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक बाबाराव मुसळे यांच्या हस्ते व चित्रपट गीतकार डॉ. विनायक पवार यांच्या उपस्थितीत होणार वितरण**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध दिवंगत कवी डॉ. विशाल इंगोले यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार यावर्षी तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या जळताना भुई पायतळी या कवितासंग्रहास जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती लोकजागर परिवाराचे विश्वस्त प्रवीण गीते यांनी दिली.

तान्हाजी बोऱ्हाडे हे इतिहास विषयात उच्चविद्याविभूषित असून ते सध्या पुणे जिल्ह्यातील मोहे या गावी शासकीय आश्रम शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी तसेच दुर्गम भागातील युवकांना स्पर्धा परीक्षा व करिअरच्या संधी बाबत ते सातत्याने मार्गदर्शन करीत असतात. विष्णू जोशी यांच्या काव्याग्रह प्रकाशन, वाशिम द्वारा प्रकाशित जळताना भुई पायतळी या कवितासंग्रहाचा सुलगती हे धरा पैरोतले हा हिंदी अनुवाद देखील प्रसिद्ध आहे.

ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक बाबाराव मुसळे यांच्या हस्ते, चित्रपट गीतकार डॉ. विनायक पवार यांच्या उपस्थितीमध्ये व भिकाजी तळेकर गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली सदर पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

प्रा. रवींद्र साळवे, प्रा.मधुकर जाधव, विठ्ठल चव्हाण वीरपांग्रा या निवड समितीने प्रस्तुत कवितासंग्रहाची पुरस्कारासाठी निवड केली असून दिनांक ०५ एप्रिल रोजी हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्मृतीशेष कवी डॉ. विशाल इंगोले मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रभू श्रीराम हे जीवनाचा आदर्श : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : समाजात सर्व प्रकारचे आदर्श प्रस्थापित करण्याचे कार्य प्रभू श्रीरामचंद्र यांनी केले. त्यामुळेच श्रीराम हे आपल्या सर्वांच्या जीवनाचा आदर्श असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यांनी केले. पश्चिम नागपूर नागरिक संघातर्फे श्रीराम नवमी निमित्त काढण्यात येणाऱ्या शोभयात्रेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. रामनगर येथील श्रीराम मंदिर परिसरात हा कार्यक्रम झाला. समाजात समता असली पाहिजे हे प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनातून दाखवून त्याच प्रकारे कार्य केल्याचे मुख्यमंर्त्यांनी यावेळी सांगतानाच उपस्थिताना श्रीराम नवमीच्या शुभेच्छा दिल्या. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार मायाताई इवानते ,आमदार विकास ठाकरे यावेळी उपस्थित होते. सायंकाळी मंदिरात आगमन होताच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर अतिथींच्या हस्ते पालखी पूजन व आरती करण्यात येऊन शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली.

# केटीएस जिल्हा रुग्णालयात पोषणयुक्त आहार संचाचे वाटप








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : दिनांक २४ मार्च २०२६ रोजी जागतिक क्षयरोग दिनी आरोग्य विभाग जिल्हा परिषद गोंदिया तर्फे केटीएस रुग्णालयात जनजागृती कार्यक्रम आणि भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रुग्णालयाच्या समाजसेवा विभागाच्या माध्यमातून रुग्णालयातील अत्यंत गरजवंत अशा क्षयरोग बाधित रुग्णांना न्यूट्रिशन किट वाटण्यात आले. या रुग्णालयाचे समाजसेवा अधीक्षक वैद्यकीय पंकज प्रकाश तागडे यांच्या समन्वयातून या कार्यक्रमात पोषणयुक्त आहार संच वाटण्यात आले. सदर कार्यक्रमात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, गोंदिया जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकिस्तक डॉ. तृप्ती कटरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमातच विविध दानदाते यांच्याकडून प्राप्त न्यूट्रिशन किट अत्यंत गरजवंत टीबी रुग्णांना वाटण्यात आले. तसेच रुग्णांना समुपदेशन व जनजागृती करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करून क्षयरोग आणि त्याचे दुष्परिणाम तसेच घ्यावयाची खबरदारी या विषयावर प्रकाश टाकला. गोंदिया जिल्ह्याचे शल्य चिकिस्तक डॉ. पुरुषोत्तम पटले यांनी या आजारावर लोकांमध्ये जनजागृती करून याविषयी लोकांना जागृत करण्याची आणि या रोगाला नियंत्रित करण्याची गरज असल्याचे सांगितले. त्याच प्रमाणे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकिस्तक डॉ. तृप्ती कटरे यांनी टीबी हारेगा, देश जितेगा असा नारा देत या अत्यंत घातक आजारावर शासनामार्फत आरोग्य केंद्रावर मोफत उपचार पद्धती उपलब्ध असून टीबीचे लक्षण असणाऱ्या व्यक्तींनी याची जिल्हा रुग्णालयात तपासणी करून घेण्यास सांगितले. न्यूट्रिशन किट देण्यात प्रशिक गडपायले, संविधान इंगोले , निखिल बैस , सनी रामटेके , दिलीप ब्राह्मणकर आदी दानदाते यांनी मदत केली. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत कार्यरत जिल्हा समन्वयक प्रज्ञा कांबळे व सहकार्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांच्या मार्गदर्शनाखाली या जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यातील मनरेगाच्या कामांवर कॅगचे ताशेरे; कोट्यवधी रुपये खर्च करूनही कामे अपूर्णच

## एकूण कामांपैकी केवळ ५२.८१ टक्के कामे पूर्ण ; महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेअंतर्गत कामांच्या अंमलबजावणीत मोठ्या त्रुटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेअंतर्गत २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत कामांच्या अंमलबजावणीत मोठ्या त्रुटी असल्याचे भारताच्या नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यांच्या अहवालातून स्पष्ट झालंय. या कालावधीत मंजूर झालेल्या एकूण कामांपैकी केवळ ५२.८१ टक्के कामे पूर्ण झालीत, ही बाब चिंताजनक मानली जातेय. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी कॅगचा अहवाल सभागृहात मांडण्यात आलाय, त्यातून ही माहिती समोर आली आहे.



तर अपूर्ण कामांवरही ५३६१.०२ कोटी खर्च : या पाच वर्षात राज्यात एकूण २५.७२ लाख कामांना मंजुरी देण्यात आलीय. त्यापैकी साधारण १३.५८ लाख कामे पूर्ण झाली, तर उर्वरित कामे अपूर्ण किंवा सुरूच झालेली नाहीत. पूर्ण झालेल्या कामांवर ६७२५.६५ कोटी खर्च करण्यात आला, तर अपूर्ण कामांवरही ५३६१.०२ कोटी खर्च झाला, म्हणजेच मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही कामे पूर्णत्वाला पोहोचलेली नाहीत. अहवालानुसार, मार्च २०२५ पर्यंत सुमारे ७.१० लाख कामे अजूनही सुरू झालेली नव्हती. त्यातील २.४८ लाख कामे (साधारण ३५ टक्के) तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. तसेच एकूण ५.०३ लाख अपूर्ण कामांपैकी १.०७ लाख कामे (२१ टक्के) तीन वर्षांपेक्षा जास्त काळापासून अडकलेली आहेत. यावरून नियोजन आणि अंमलबजावणीत गंभीर त्रुटी असल्याचे दिसते असे कॅगच्या अहवालातून समोर आलंय.

१५ दिवसांच्या आत काम देणे बंधनकारक : योजनेच्या नियमांनुसार, कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांच्या आत काम देणे बंधनकारक आहे. जर काम उपलब्ध करून दिले नाही, तर संबंधित कुटुंबांना बेरोजगारी भत्ता द्यावा लागतो. मात्र, २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत देय असलेल्या ३४.८५ लाख बेरोजगारी भत्त्यापैकी फक्त २,२६८ इतकीच रक्कम वितरित करण्यात आली, तर उर्वरित ३४.८३ लाख थकबाकी राहिली. यावरून काम न मिळालेल्या लाभार्थ्यांनाही हक्काचा भत्ता मिळाला नसल्याचे दिसून येते.

३१४ प्रकरणांमध्ये ४.४४ कोटींची वसुली अजूनही प्रलंबित : सामाजिक लेखापरीक्षण बाबतही गंभीर उणिवाही या अहवालातून समोर आलेल्या आहेत. या कालावधीत ७२.४३ टक्क्यांपासून ते ९५.६७ टक्क्यांपर्यंत ग्रामपंचायतींमध्ये सामाजिक लेखापरीक्षण झालेले नाही. सामाजिक लेखापरीक्षण हे योजनेतील पारदर्शकता आणि जनतेच्या देखरेखीचे महत्त्वाचे साधन असतानाही त्याकडे दुर्लक्ष झाले. त्याचबरोबर सामाजिक लेखापरीक्षण युनिटने निदर्शनास आणलेल्या १,०८४ गैरव्यवहार प्रकरणांमध्ये ११.२२ कोटी वसूल करायचे होते, त्यापैकी ३१४ प्रकरणांमध्ये ४.४४ कोटींची वसुली अजूनही प्रलंबित आहे.

राज्य सरकारकडूनही पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही : अहवालात निधीअभावी सामाजिक लेखापरीक्षण कमी प्रमाणात झाले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. केंद्र सरकारकडून मिळणारा निधी आवश्यकतेच्या एक तृतीयांशपेक्षाही कमी असल्याने नियोजित प्रमाणात लेखापरीक्षण होऊ शकले नाही. राज्य सरकारकडूनही पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही, असे सामाजिक लेखापरीक्षण युनिटने स्पष्ट केले आहे. योजनेच्या देखरेखीकरिता स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेच्या बैठका नियमित झालेल्या नाहीत, ही देखील गंभीर बाब अहवालात नमूद आहे. तसेच,कामांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी राज्यस्तरावर संचालक नेमण्यात आले असले तरी जिल्हास्तरावर आवश्यक गुणवत्ता निरीक्षक (डटच) नेमले गेलेले नाहीत.

वर्षनिहाय आकडेवारीवरूनही स्थिती बिघडत चालल्याचे दिसते.

२०१९-२० मध्ये ८२म कामे पूर्ण झाली, तर

२०२०-२१ मध्ये ८१म,

२०२१-२२ मध्ये ६१म,

२०२२-२३ मध्ये ४५म, आणि

२०२३-२४ मध्ये केवळ २३% कामे पूर्ण झाली.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह : याचबरोबर अपूर्ण आणि सुरू न झालेल्या कामांचे प्रमाण दरवर्षी वाढताना दिसते, ज्यामुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकूणच मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होऊनही कामे पूर्ण न होणे, लाभार्थ्यांना वेळेवर काम व भत्ता न मिळणे, सामाजिक लेखापरीक्षणातील त्रुटी आणि देखरेखीचा अभाव या कारणांमुळे या योजनेची अंमलबजावणी अपेक्षित दर्जाची नसल्याचे एअउ अहवालातून स्पष्ट झालंय.

---

# बोपगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी संदिप फडतरे बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : पुरंदर ::पुरंदर तालुक्यातील बोपगाव विविध कार्यकारी विकास सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन प्रमोद रामचंद्र फडतरे यांनी राजीनामा दिल्यामुळे चेअरमनपदी संदीप सुधाकर फडतरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमरीन बागवान यांनी काम पाहिले. पुरंदर नागरी सहकारी पतसंस्थेचे सर व्यवस्थापक अनिल उरवणे यांनी निवडणूक कामी सहकार्य केले.

नेते व सामाजिक कार्यकर्ते संदीप फडतरे हे सध्या निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती आहेत. त्यांनी बोपगाव विकास सोसायटीच्या चेअरमन पदी निवड केल्याबद्दल बोपगावकर ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले. शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणी, प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी सदैव कार्यतत्पर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोपगाव विविध कार्यकारी विकास सेवा सहकारी सोसायटीचे संचालक व्हाईस चेअरमन सुरज सुभाष जगदाळे सोपान आ. फडतरे, अपुल कि.फडतरे, विजय ल. फडतरे, बापू अ.फडतरे, भिमाजी सि. फडतरे आप्पासो रा. फडतरे, मनिषा मो. फडतरे, सुशिला गे. फडतरे, सोमा श्री. गोफणे, संपत रा. गायकवाड आदींसह बोपगावकर ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी संजय जगताप, माजी पंचायत समिती सदस्य सुनिता कोलते, भाजपा नेते विठ्ठल मोकाशी संभाजी काळाणे, डॉ. मनोज शिंदे, पीडीसीसी बँकेचे विभागीय अधिकारी महेश खैरे, पुरंदर तालुका भाजपा उपाध्यक्ष दिलीप कटके, शेखर कटके जयवंत साळुंखे यांनी चेअरमन संदीप फडतरे यांचा सन्मान केला.

यावेळी सरपंच सारिका गुरव, गाव कारभारी दयानंद फडतरे, योगेश फडतरे , प्रकाश फडतरे, जयवंत फडतरे, नागेश फडतरे, दत्तशेठ फडतरे, रामभाऊ फडतरे, बाबूशेठ फडतरे, शहाजी फडतरे, कानिफनाथ फडतरे,विश्वास फडतरे, बाळासाहेब फडतरे, राजेंद्र फडतरे, भाऊसाहेब फडतरे, साहेबराव जगदाळे, साहेबराव फडतरे, संजय फडतरे अशोक जगदाळे, काकासाहेब जगदाळे , तुकाराम फडतरे, निवृत्ती फडतरे, काळूनाना पवार तानाजी फडतरे आदींसह बोपगावकर ग्रामस्थ उपस्थित होते.

# कळंब येथे माजी आमदार दयानंद गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्याचे माजी आमदार दयानंद गायकवाड यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवाराच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी स्वरमधुर गायक वाहक चौधरी यांच्या हस्ते दयानंद गायकवाड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांनी दयानंद गायकवाड यांच्या जनसंपर्क, नेतृत्वशैली आणि परिसरातील विकासासाठी केलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख केला.या वेळी सामाजिक कार्यकर्ते यांच्या सह शहरातील समाजबांधव उपस्थित होते.

---



# प्रा. डॉ. महेश बनकर यांना महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नालंदा विद्यापीठ व फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आयोजित, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व सुप्रसिद्ध निवेदक हा नालंदा कर्तृत्व गौरव पुरस्कार डॉ. महेश बनकर यांना नुकताच पुणे येथील पत्रकार भवन नवी पेठ, पुणे येथे प्रदान करण्यात आला...

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय निफाड येथील उपक्रमशील प्रा. डॉ. महेश बनकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि निसर्ग संवर्धन विषयक उत्कृष्ट कार्याची दाखल घेत, त्यांना नालंदा विद्यापीठ व फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आयोजित, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व सुप्रसिद्ध निवेदक हा नालंदा कर्तृत्व गौरव पुरस्कार सपत्नीक सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. ह्या पुरस्कार वितरण समारंभासाठी डॉ. राजेंद्र सिंह वालिया ( महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष व माजी सैनिक भारतीय सेना, राष्ट्रीय समिती अँटी करप्शन अँड क्राइम कंट्रोल फोर्स ) नितीन धवणे पाटील ( राष्ट्रीय अध्यक्ष मराठी चित्रपट असोसिएशन ) डॉ. नीता जोशी ( शास्त्रज्ञ ), दीपकजी जाधव आणि मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथील पत्रकार भवन नवी पेठ, पुणे येथे संपन्न झाला.

डॉ. महेश बनकर यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई भागवत बोरस्ते, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, प्रा. शशिकांत मोगल, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, डॉ. उत्तमराव डेर्ले, सर्व प्राध्यापक वृंद आणि आप्तेष्ट नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# हिपळे गावाला मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची भेट देऊन केली कामकाज, शाळेची पाहणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हिपळे ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत राज अभियानांतर्गत सुरू असलेल्या उपक्रमाची पाहणी करण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांनी हे हिपळेला भेट दिली.

हिपळे ग्रामपंचायतचे सरपंच श्रीमती मायावती पाटील यांनी विविध उपक्रमातून गावचा सर्वांगीण विकास हाती घेतला आहे. शासनाचे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सध्या अनेक उपक्रम सुरू आहेत. या उपक्रमाची पाहणी करून योग्य त्या सूचना करण्यासाठी सीईओ कुलदीप जंगम यांची ही सदिच्छा भेट होती. यावेळी त्यांनी ग्रामपंचायतीच्या दप्तरांची पाहणी केली. व गावातील स्वच्छता, वृक्ष लागवड आणि इतर कामाची माहिती घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या संदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मधून मी निमंत्रित केले आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, असे हिपळेचे श्रीमती सरपंच मायावती पाटील यांनी सांगितले या निमित्ताने शाळा ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधला असून सीईओ जंगम यांनी महिला सरपंच श्रीमती मायावती पाटील यांच्यासह ग्राम पंचायतीच्या सदस्यांना सोबत घेऊन शाळेच्या इमारतीची पाहणी केली यावेळी शाळेतील विविध उपक्रमाची माहिती शिक्षकाकडून जाणून घेतली आहे. यावेळी सोबत सरपंच श्रीमती मायावती पाटील, उपसरपंच चंद्रकला जाधव, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र करजोळे, सिद्धार्थ गावडे, चंद्रकला हुकेरी सुरेश देशमुख शबाना मुल्ला ग्रामसेवक रेश्मा सुतार आणि ग्रामपंचायत कर्मचारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## स्प्रिंट ह्युमॅनिटेरियन प्रकल्पाचा पुढाकार

# आपत्ती व्यवस्थापनात किशोरवयीनांचे प्रजनन आरोग्य कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा आणि इंडियन रेड क्रॉस सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्प्रिंट ह्युमॅनिटेरियन प्रकल्पांतर्गत डोलसंट सेक्शुअलिटी अँड रिप्रोडक्टिव हेल्थ इन इमर्जन्सी अर्थात आपत्ती व्यवस्थापनात किशोरवयीनांचे प्रजनन आरोग्य या विषयावर युवावर्गासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा श्रीमती गोपाबाई दमाणी रक्त संकलन केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडली.




कार्यशाळेचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या ब्युरो इंचार्ज डॉ. मंजिरी कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर होते.

व्यासपीठावर एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी प्रा. वर्षा बंदिचोडे, तसेच युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत, साक्षी सर्वगोड, सृष्टी सर्वगोड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेत विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी किशोरावस्था, कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरण व त्याविषयीचे गैरसमज यावर सविस्तर माहिती दिली. प्रा. डॉ. नभा काकडे यांनी लिंगभेद आधारित हिंसाचार या विषयावर प्रकाश टाकला. सुगतरत्न गायकवाड यांनी एचआयव्ही/एड्स विषयी माहिती दिली, तर वीरेंद्र परदेशी यांनी आपत्ती व्यवस्थापन आणि किशोरवयीन प्रजनन आरोग्य यातील परस्परसंबंध स्पष्ट केले. दमाणी रक्त संकलन केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी अमरजा थिटे यांनी सीपीआर व प्रथमोपचाराचे प्रात्यक्षिक दिले. सोमपा अग्निशमन केंद्राचे अधिकारी समीर पाटील यांनी अग्निशमन व आपत्तीच्या वेळी युवकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. तसेच संगीता कोरे यांनी थॅलेसेमिया या विषयावर माहिती दिली.

या कार्यशाळेत संगमेश्वर कॉलेज, चंदेले समाजकार्य महाविद्यालय, अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्सेस, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय (समाजकार्य विभाग) तसेच श्री सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील विद्यार्थी आणि फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे युवा प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थी, युवा प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

# रस्ते अपघातग्रस्तांसाठी जीवनदायी असलेली 'पीएम-राहत' योजना प्रभावीपणे राबवा

## सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर; अपघातग्रस्तांना तातडीने ७ दिवसांपर्यंत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णत: निशुल्क देण्यात येणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने दीड (१.५०) लाख रुपयापर्यंतचे उपचार पूर्णत: निशुल्क उपलब्ध करून देण्याऱ्या 'पीएम-राहत' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य हमी सोसायटीची भूमिका महत्वाची आहे. रूग्णाला 'गोल्डन अवर'मध्ये तातडीचे उपचार देवून मृत्यूदर कमी करण्यास कटिबद्ध रहावे असे आवाहन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात आयोजित जनआरोग्य योजनेच्या बैठकीत केले.

केंद्र शासनाच्या सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी ''प्रधानमंत्री – रस्ता अपघातग्रस्त रुग्णालयीन उपचार आणि हमी उपचार (पीएम – राहत) योजना'' आणली आहे. या योजने अंतर्गत ''आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'' व ''महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना'' अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या राज्यातील कोणत्याही रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने ७ दिवसांपर्यंत दीड (१.५०) लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णत: निशुल्क (रोखरहित) देण्यात येणार आहेत. अनेकदा अपघात झाल्यावर आर्थिक अडचणींमुळे उपचारास विलंब होतो. वेळेत उपचार मिळत नाहीत. ''पीएम-राहत'' योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

पीएम -राहत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य सोसायटीच्या प्रशासनाची भुमिका महत्वाची असुन, रूग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी अंगीकृत रुग्णालयात दाखल करणे. पोलिसांकडून अपघाताची खात्री करून उपचारांना मान्यता देणे, झच-ठअहअढ योजनेअंतर्गत उपचारास मंजूरी देणे व मंजूर दावे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करण्याची आरोग्य सोसायटीची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात (पीएम -राहत ) योजना राबवण्यासाठी परिवहन विभागाच्या अखत्यारीतील ''राज्य रस्ते सुरक्षा परिषद'' ही नोडल एजन्सी नियुक्त करण्यात आली असुन, योजनेची अंतिम देयके परिवहन विभागामार्फत दिली जातात.

रस्ते अपघातानंतर २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व अपघातग्रस्त भारतीय तसेच परदेशी नागरिकांनाही ''पीएम राहत'' योजनेचा लाभ मिळणार आहे. उपचार खर्च अपघाताच्या तारखेपासून कमाल ७ दिवसांपर्यंत समाविष्ट (आवृत) केला जाणार आहे. या योजनेअंतर्गत नियुक्त (निर्दिष्ट) व अनियुक्त (अनिर्दिष्ट) रुग्णालयांमध्येही उपचार करता येणार आहेत.

पीएमजेएवाय, एमजेपीजेएवाय व पीएम राहत योजनेत सामाविष्ट अंगीकृत रुग्णालये ही नियुक्त (निर्दिष्ट) रुग्णालये आहेत. या व्यतिरिक्त सर्व रुग्णालये अनियुक्त (अनिर्दिष्ट) रुग्णालये आहेत. या सर्व रुग्णालयांत अपघातग्रस्त रुग्णास स्थिरीकरण उपचार देणे अपेक्षित आहे. स्थिरीकरण उपचारानंतर रुग्णास पुढील उपचारांसाठी नियुक्त (निर्दिष्ट) अंगीकृत रुग्णालयात हलविणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी ११२ या आपत्कालीन प्रतिसाद सहाय्य प्रणाली क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच या योजनेची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले आहे.

या बैठकीला सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, नागरी आरोग्य अभियान आयुक्त सुनील भोकरे, जन आरोग्य योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, आरोग्य विभागाच्या सह संचालिका डॉ. सुनीता गोल्हाईत व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने मारुती बनसोडे सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या वतीने सन २०२०- २१ ते २४ -२५ या कालावधीतील पाच वर्षाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराचे दि.२६ मार्च २०२६ रोजी मुंबईत वितरण करण्यात आले.या.प्रसंगी नळदुर्ग ता. तुळजापूर येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांना सन २०२३ २४ यावर्षीचा राष्ट्रपिता महात्मा गांधी राजस्त्रीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, केंद्रीय सामाजिक न्याय व आधिकातता राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले साहेब, सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र शासन मा. ना. संजय शिरसाट, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण संचालक डॉ. दीपा मुधोळ - मुंडे,आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी राज्यातील एकूण १०० व्यक्ती आणि १३ संस्थांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यात धाराशिव जिल्ह्यातून एकमेव मारुती बनसोडे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.सन्मान चिन्ह, सन्मान पत्र, शाल,आणि रोख १५००० रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मारुती बनसोडे हे गेली तीन चार वर्षे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे धाराशिव जिल्हा संघटक म्हणून काम करीत आहेत. जिल्ह्यातील अनेक शाळा, कॉलेज मध्ये जाऊन ते प्रबोधनाचे काम करीत आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेवून त्याना सदर पुरस्काराने समानीत करण्यात आले असून सदर पुरस्कार त्याना मिळाल्या बदल जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील व्यक्तीकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# वीर भारत तरुण मंडळातर्फे साईबाबा जयंती भक्तीभावात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या अशोक चौक येथील वीर भारत क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने सालाबादप्रमाणे यंदाही श्रीराम नवमीनिमित्त श्री साईबाबा जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. महापौर श्री.विनायकजी कोंड्याल, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतीले यांच्या हस्ते साईबाबांच्या मूर्तीचे पूजन करून महाआरती करण्यात आली. त्यानंतर जय माताजी मंडळाचे आधारस्तंभ दिनेश घोडके,संतोष घोडके, सामाजिक कार्यकर्ते श्री. सूर्यकांतजी गोडाळे सौ.सुनीता गोडाळे ,मी वडार महाराष्ट्राचा महिला संघटनेच्या शहराध्यक्षा ज्योती चौगुले व सोलापूर जनता बँकेच्या अधिकारी सौ. संगीता वडतिले यांच्या हस्ते मंडळाच्यावतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला.त्याचा त्या परिसरातील शेकडो भाविकांनी लाभ घेतला.महाआरतीनंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिशबाजी करण्यात आली. तेथे आकर्षक, सुबक रंगीबेरंगी रांगोळी काढण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर प्रभू रामचंद्रमय व साईमय झाला होता.



मंडळाचे प्रमुख श्री. नागेशजी चौगुले यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांनी वीर भारत तरुण मंडळाचे पूजेला बोलल्याबद्दल आभार मानले व मंडळास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ज्योती चौगुले यांनी, मंडळाच्यावतीने विविध उपक्रम तसेच गेल्या १५ वर्षापासून रामनवमीनिमित्त महाप्रसाद वाटप केले जाते असे सांगितले.मंडळाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल पत्रकार वडतीले यांनी समाधान व्यक्त केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्रीती देवरमणी,गोविंद बंदपट्टे, कार्तिक चौगुले, गणेश लिंबोळे, नामदेव बंदपट्टे केतन चौगुले, समर्थ चौगुले, नागेश चौगुले आदींनी केले.




# जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड बोरोटी (खु) शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**जि.प. सदस्य शिवराज म्हेत्रे यांच्या हस्ते उद्घाटन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड बोरोटी (खु) शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन नूतन जिल्हा परिषद सदस्य शिवराज म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे दिव्य सानिध्य श्री. ब्र. मरुळाराध्य शिवाचार्य महास्वामिजी, माशाळ यांनी भूषविले होते.अध्यक्षस्थानी सरपंच अशोक ढंगापूरे होते, तर गौरवाध्यक्ष म्हणून काशिनाथ कळसगोंड उपस्थित होते.

प्रतिमा पूजन प्रथमेश महेश इंगळे, वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थान अक्कलकोट येथील विठ्ठल कोळी व धरेप्पा हालोळी यांच्या हस्ते पार पडले. स्टेज पूजन सादिक जमादार व संतोष कोळी यांनी केले. दीपप्रज्वलन हुसेनी नंदिवाले, के. बी. पाटील, पंडित मुळे व लक्ष्मीकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

संगीत वाद्य पूजन सोमशेखर जमशेट्टी व राजशेखर उंबराणीकर यांनी केले, तर नटराज पूजन महादेव खेड, शरणू पुजारी, प्रकाश कोळी व धानप्पा कलशेट्टी यांच्या हस्ते पार पडले. रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाला चालना देण्याचा उपक्रम लक्ष्मीपुत्र किरनल्ली, यल्लालिंग तळवार, प्रभाकर ढंगापुरे, सोमय्या स्वामी व देवेंद्र हुल्लूर यांनी पार पाडला.

यावेळी बोलताना शिवराज म्हेत्रे यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

दिव्य सानिध्यातून मार्गदर्शन करताना मरुळाराध्य शिवाचार्य महास्वामिजींनी सीमावर्ती भागातील कन्नड शाळा टिकवण्यासाठी कर्नाटक व महाराष्ट्र राज्य सरकारांनी ठोस भूमिका घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना मातृभाषेत शिक्षण मिळाल्यास ते अधिक यशस्वी होतात, असे त्यांनी नमूद केले. तसेच युवकांनी पुढाकार घेऊन शाळेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शाळेतील एकूण ३५ विद्यार्थी ३० सांस्कृतिक कार्यक्रम करून इतिहास निर्माण केले. लावणी, हास्य नाटक,सामाजिक संदेश देणारा नाटक,व्यसनमुक्ती संदेश,पर्यावरण रक्षण करणारे संदेश नाटकातून गाण्यातून नृत्यातून दिले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले झी कन्नड सारेगमपचे गायक रेवणसिद्ध फुलारी व श्रीसनिध्य यांनी सादर केलेल्या सुंदर गीतांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

यावेळी शाळेचे स्थापनेपासूनचे सर्व माजी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना विशेष सरकार करण्यात आले.

या वेळी शाळेचे माजी शिक्षक व माजी विद्यार्थी पालक,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख शरणप्पा फुलारी, मुख्याध्यापक राजश्री तांबे, सहशिक्षक अनंत बांगर, सहाय्यक शिक्षिका अंजली वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धाराम बिराजदार, उपाध्यक्ष चिदानंद शिंगे, गोपाल लोहार, राजू हालोळी, काशिनाथ वाडी, रविकांत लोहार यांच्यासह गावातील युवक मंडळ पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनीही सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत पाटील यांनी मानले.

**सलग ३६ तास चालला हा उपक्रम** | **भारतातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी**

# स्वेरीत राष्ट्रीय स्तरावरील 'चक्रव्यूह २.०' संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील 'चक्रव्यूह २.०' हा सलग ३६ तासांचा तांत्रिक संशोधनपर उपक्रम संपन्न झाला. यामध्ये भारतातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्वेरीच्या वतीने सर्व सहभागी विद्यार्थ्यांसाठी राहण्याची व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे बाहेरून आलेले स्पर्धक समाधानाने परतले.

दीपप्रज्वलन आणि प्रास्ताविकानंतर सर्व मान्यवरांनी 'चक्रव्यूह २.०' च्या पत्रकाचे अनावरण करून या तांत्रिक स्पर्धेची सुरुवात केली. कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. सुनीता साळसिंगिकर ह्या होत्या. त्यांच्यासह विभागप्रमुख डॉ. पी. ए. सातारकर व्यासपीठावर उपस्थित होत्या. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे यांनी 'चक्रव्यूह २.०' सारख्या संशोधन व स्पर्धात्मक कार्यक्रमांचे महत्त्व तसेच नोकरीच्या संधींसाठी आणि कौशल्य विकासासाठी असे उपक्रम कसे उपयुक्त ठरतात याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले. यानंतर तब्बल ३६ तासांनंतर बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या समारंभाला यशस्वी उद्योजक व स्वेरीचे माजी विद्यार्थी बापू अरकस व प्रदीप गाडेकर हे अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी शालेय अभ्यासक्रमासोबतच अशा संशोधनपर कार्यक्रमांमध्ये प्रकल्प करण्याचे महत्त्व त्यांच्या जीवनातील उदाहरणांमधून सर्वांना पटवून दिले. या 'चक्रव्यूह २.० ' उपक्रमामध्ये हॅकाथॉन, प्रोजेक्ट डेव्हलपमेंट व प्रेझेंटेशन, यूआय/ यूएक्स डिझाईन, कोडिंग व डिबगिंग स्पर्धा, तांत्रिक प्रश्नमंजुषा तसेच आयडिया प्रेझेंटेशन अशा विविध तांत्रिक स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्याचा अनुभव, टीमवर्क व नेतृत्व गुणांचा विकास, वेळेचे नियोजन, तसेच इंडस्ट्री-ओरिएंटेड कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या करिअरच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी पाहुण्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले. सर्व विजेत्यांना मिळून एकूण रोख रुपये ८० हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्रे देण्यात आली.



या उपक्रमात महाराष्ट्रासह लगतच्या राज्यातील जवळपास ६०० संशोधक विद्यार्थी स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम प्रमुख श्रीप्रिया कारंडे, मुख्य संयोजक दिपक पवार, तसेच सह-मुख्य संयोजक ओंकार भोसले यांच्यासह समन्वयक प्रा. व्ही. डी. जाधव, इतर प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांचा सहकार्याने आणि उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार व कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुख डॉ. प्राजक्ता सातारकर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे, डॉ. सचिन खोमणे इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थिनी समन्वयक गौरी माने व प्रणाली इंगोले यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. सारीका हजारे यांनी आभार मानले.

# गौरव कर्तव्याचा; सत्कार समाजसेवकांचा..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातुग प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन यांच्यातर्फे देण्यात येणारा नेताजी सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ वितरण रविवार दि. २९ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे, त्या अनुषंगाने ठिकठिकाणी बॅनर बाजी करण्यात आली असून या कार्यक्रमाचे नियोजन गेले आठ दिवसापासून चालू आहे. या पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून पुरस्कार सत्कारमूर्ती येणार असून, या कार्यक्रमाला जास्तीत जास्त लोकसंख्येने हजर राहण्याचे आव्हान या नियोजन कमिटीचे प्रमुख व महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन चे संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन यांनी आव्हान केले आहे.

